

संकेश्वर : सायबर क्राईमबाबत जनजागृती करताना निडसोशी बीसीए महाविद्यालयाचे विद्यार्थी.

# सायबर क्राईमबाबत जनजागृती

**संकेश्वर :** आधुनिक काळात फसवणुकीचे प्रमाण वाढत आहे. त्यासाठी निडसोशी एसएनजेपीएस बीसीए महाविद्यालयातर्फे संकेश्वर येथील जनावर बाजारात शेतकरीबांधवांना सायबर क्राईमबाबत जनजागृती करण्यात आली. विविध प्रकारच्या फसवणुकीबाबत नाट्यप्रयोग सादर करून नागरिकांना माहिती देण्यात आली. फसवणुकीपासून दूर राहण्याचे आवाहन करीत मोबाईलवर येणारे ओटीपी, सोशल मीडियावर आलेले संदेश व लिंक याची शहानिशा करून माहिती देण्याबाबत जनजागृती करण्यात आली. या जनजागृती कार्यक्रमात प्रा. बसवराज हालभावी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शविला.